भगवान परशुरामांच्या आशीर्वादाने तुमच्या जीवनात शांती, आनंद आणि समृद्धी येवो.
परशुराम जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा..!

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक
# हिंदुस्थान
अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४




■ वर्ष ७५ वे/अंक २५० वा ■ ■ अमरावती,मंगळवार,दिनांक २९ एप्रिल २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर १५ वैशाख १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■

किलो प्रमाणे मिळेल ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता ९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत
सागर प्लास्टिक 100% होलसेल भावात
प्रो. प्रा. आकाश प्रकाशराव शिरभाते
मल्टी मॉल
चित्रा चौक, फुटाणा लाईन, अमरावती
इस से सस्ता और अच्छा कही नही
8184057777 9822032885
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता किलो प्रमाणे मिळेल ९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत

# सीमेवरील तणावादरम्यान भारताचे मोठे पाऊल

## राफेल-एम विमानांसाठी फ्रान्ससोबत करार



नवी दिल्ली दि. २८ : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाल्यानंतर देशभरात दहशतवाद आणि पाकिस्तानविरोधात संतापाची लाट उसळली आहे. केंद्र सरकारनेही पाकिस्तानविरोधात आक्रमक पावलं उचलण्यास सुरुवात केल्याने युद्धाला कधीही तोंड फुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या तणावाच्या वातावरणात भारतानं संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असा एक मोठा करार रेला आहे. आज भारत आणि फ्रान्समध्ये २६ राफेल-एम विमानांसाठी तब्बल ६३ हजार कोटी रुपयांचा करार झाला आहे.

या करारांतर्गत भारतीय नौदलासाठी फ्रान्सकडून २६ राफेल मरीन विमानं खरेदी केली जाणार आहेत. या काराखेळी भारताचं प्रतिनिधित्व संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी केलं. यावेळी नौदलाचे उपप्रमुख ॲडमिरल के. स्वामिनाथन हे सुद्धा उपस्थित होते.

भारत आणि फ्रान्समध्ये झालेल्या करारानुसार २२ सिंगल सिट आणि चार डबल सिट असलेली विमानं खरेदी केली जाणार आहेत. ही विमानं आयएनएस विक्रांतवर तैनात केली जाणात आहेत. त्यामुळे सागरी हद्दीत पाकिस्तानला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

राफेल एम हे एक मल्टिरोल लढाऊ विमान आहे. त्याचा एईएसए (उर्वरित पान २ वर)

# आर. अश्विनला पद्मश्री, पीआर श्रीजेशला पद्मभूषण; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते गौरव

नवी दिल्ली दि. २८ : सोमवारी (२८ एप्रिल) राष्ट्रपती भवन येथे झालेल्या शासकीय समारंभात भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते भारताचे माजी क्रिकेटपटू आर अश्विन यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. आर अश्विन यांनी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असताना आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम करत असल्याची घोषणा केली होती. त्यांनी कसोटी क्रिकेटमध्ये भारतीय संघासाठी बहुमूल्य योगदान दिलं. या योगदानामुळे त्यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. अश्विन यांच्या कामगिरीबद्दल बोलायचं झालं, तर त्यांनी कसोटी संघाला उंचीवर घेऊन जाण्यात मोलाची भूमिका बजावली



आहे. यासह त्यांनी २०११ मध्ये झालेल्या वनडे वर्ल्डकप स्पर्धेत आणि २०१३ मध्ये झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली होती.

आर अश्विन यांच्या कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं, तर त्यांना भारतीय संघाकडून १०६ कसोटी सामने खेळण्याची संधी मिळाली. यादरम्यान त्यांनी ५३७ गडी बाद केले. ते कसोटी क्रिकेटमध्ये भारताकडून सर्वाधिक गडी बाद करणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत दुसऱ्या स्थानी आहेत. गोलंदाजीसह त्यांनी फलंदाजीतही बहुमूल्य योगदान दिलं आहे. फलंदाजी करताना त्यांनी ६ शतकांसह ३५०३ धावा केल्या आहेत. यासह वनडे क्रिकेटमधील कामगिरीबद्दल बोलायचं झालं, तर त्यांनी १५६ गडी बाद केले आहेत. तर टी-२० क्रिकेटमध्ये त्यांनी ७२ गडी बाद केले आहेत.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम केल्यानंतर आर अश्विन सध्या आयपीएल २०२५ स्पर्धा खेळण्यात व्यस्त आहेत. आयपीएल २०२५ स्पर्धेसाठी झालेल्या लिलावात चेन्नई सुपर किंग्जने बोली लावून त्यांना आपल्या संघात स्थान दिलं. यापूर्वी २०२४ मध्ये झालेल्या आयपीएल हंगामात ते राजस्थान रॉयल्स संघाकडून खेळताना दिसून आले होते. मात्र आयपीएल २०२४ स्पर्धेनंतर राजस्थान रॉयल्सने त्यांना रिलीज करण्याचा निर्णय घेता होता. आता त्यांना पद्मश्री हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार भारतातील चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे.

या समारंभात, भारताच्या हॉकी संघाचे माजी (उर्वरित पान २ वर)

# ईडी कार्यालयाला आग




मुंबई दि. २८ : महत्त्वाच्या अनेक प्रकरणांचा तपास करणाऱ्या सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) दक्षिण मुंबईतील कार्यालयात रविवारी पहाटे आग लागल्याने खळबळ उडाली. आग नेमकी कशी लागली? किती नुकसान झाले? कागदपत्रे जळाली का? नेमकी कोणती कागदपत्रे जळाली? आदी प्रश्नांचे गूढ कायम आहे. त्याचा तपास सुरू झाला असला तरी या आगीतून संशयाचा धूर पसरू लागला आहे.

बॅलार्ड इस्टेट परिसरातील कैसर-ए-हिंद या पाच मजली इमारतीत ईडीचे कार्यालय आहे. रविवारी पहाटे अडीचच्या सुमारास ही आग लागली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने धाव घेतली. तोवर (पान २ वर)

# पाकिस्तानातून महाराष्ट्रात आलेल्या सिंधी लोकांनाही परत जावे लागणार : फडणवीस


मुंबई दि. २८ : पाकिस्तानी नागरिकांवरून राज्यातील महायुती सरकारमध्ये समन्वयाचा आभाव असल्याचं रविवारी (२७ एप्रिल) पाहायला मिळालं होतं. केंद्र सरकारने भारतात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांना २७ एप्रिलपर्यंत देश सोडून जाण्याचे आदेश दिले होते. महाराष्ट्रातही अनेक पाकिस्तानी नागरिक वेगवेगळ्या व्हिसावर आले आहेत. मात्र, महाराष्ट्रातील १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता असल्याचं वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं होतं. तर, राज्यात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांपैकी एकही जण बेपत्ता नाही, असं फडणवीस म्हणाले होते. दोन्ही नेत्यांच्या या परस्परविरोधी वक्तव्यांवर फडणवीस यांनी आज स्पष्टीकरण दिलं.



देवेंद्र फडणवीस यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, बऱ्याचदा नेत्यांना अधिकारी वेगवेगळी माहिती देत असतात. त्यानुसार नेते वक्तव्य करतात. केंद्र सरकारच्या आदेशानुसार जे पाकिस्तानी नागरिक आपला (उर्वरित पान २ वर)

# दिल्ली बिहारपासून लांब आहे का? सर्वपक्षीय बैठकीला उपस्थित न राहिल्याने खरगेंचा मोदींवर निशाणा

नवी दिल्ली दि. २८ : पहलगाम दहशतवादी हल्ल्यामध्ये २६ नागरिकांना प्राण गमवावे लागल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. दहशतवाद्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी सत्ताधाऱ्यांपासून विरोधकांपर्यंत केली जात आहे. विरोधकांनीही या प्रकरणात सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. पहलगाम हल्ल्यावरुन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मोठे विधान केले आहे.



आमच्यासाठी देश प्रथम येतो. धर्म, जात किंवा पक्ष नंतर आहे, असं मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. तसेच खरगे यांनी ५६ इंचाच्या छातीचा उल्लेख करत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे.

जयपूरमधील संविधान वाचवा रॅली दरम्यान मल्लिकार्जुन खरगे बोलत होते. आपण सर्वांनी देशासाठी एकता दाखवली पाहिजे. तसेच मोदी सरकारने बोलावलेल्या सर्वपक्षीय (उर्वरित पान २ वर)

# आता चर्चा नाही, पाकिस्तानशी अखेरची लढाई : फारुख अब्दुल्ला



जम्मू दि. २८ : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे देशभरात संतापाची लाट आहे. सामान्य नागरिकांपासून ते अनेक नेत्यांपर्यंत अनेकांनी पाकिस्तानला त्यांच्या भाषेत धडा शिकवण्याची मागणी करत आहेत. अशातच, जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनीदेखील या हल्ल्यासाठी पाकिस्तानचा तीव्र शब्दात निषेध केला. (पान २ वर)

# 'शरिया कोर्ट', 'कोर्ट ऑफ काझी' यांना कायदेशीर मान्यता नाही; त्यांचे निर्देश बंधनकारक नाहीत: सर्वोच्च न्यायालय



नवी दिल्ली दि. २८ : सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणाच्या सुनावणी वेळी, कोर्ट ऑफ काझी, काझियत कोर्ट आणि शरिया कोर्ट, कोणत्याही नावाने ओळखले जात असले तरी, त्यांना कायद्यात कोणतीही मान्यता नाही आणि त्यांनी दिलेले कोणतेही निर्देश कायद्यात लागू करण्यायोग्य नाहीत, याचा पुनरुच्चार केला आहे. यावेळी न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला यांच्या खंडपीठाने २०१४ च्या विश्व लोचन मदन विरुद्ध केंद्र सरकार या खटल्यातील निकालाचा हवाला दिला, ज्यामध्ये शरियत न्यायालये आणि फतव्यांना कायदेशीर मान्यता नसल्याचे म्हटले होते.

सदर प्रकरणात एका महिलेने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. (उर्वरित पान २ वर)

## माहोल....




साहेब पाकिस्तानात जायला पाकिस्तानचे असणे गरजेचे आहे का ?नाही कारण आमच्या घरात एक आहे मला तिला बाहेर काढायचे होते...

## तापमान

| | | |
|---|---|---|
| अमरावती | - | ४२.८ |
| अकोला | - | ४४.५ |
| बुलढाणा | - | ४१.० |
| ब्रह्मपुरी | - | ४१.७ |
| चंद्रपूर | - | ४१.८ |
| गडचिरोली | - | ४०.० |
| गोंदिया | - | ३८.० |
| नागपूर | - | ४२.३ |
| वर्धा | - | ४२.४ |
| वाशिम | - | ४२.४ |
| यवतमाळ | - | ४२.९ |
| भंडारा | - | ३८.६ |

AC SPECIALIST SHOWROOM
सर्वात मोठी रेंज
घा फक्त ₹1111/-* व घेऊन जा नविन AC
मॉडर्न इलेक्ट्रॉनिक मॉल
रुक्मिणी नगर अमरावती 8600050015
DAIKIN
एअर कंडीशनर्स
START FROM 21990/-*
0% EMI Finance
केडिया ट्रेडर्स 9049912413

## भाजपने अध्यक्षपदाची निवडणूक पुढे ढकलली

नवी दिल्ली दि. २८ : भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आली आहे. पक्षश्रेष्ठींनी हा निर्णय घेतला आहे. येत्या मे महिन्यात ही निवडणूक अपेक्षित होती. पण, पहलगाम दहशतवादी हल्ल्यामुळे सध्या देशात तणावाचे वातावरण आहे, त्यामुळे हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. परिस्थिती सामान्य झाल्यानंतरच निवडणुकीचा निर्णय घेतला जाऊ शकतो.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे भाजपच्या संघटनात्मक निवडणुका (पान २ वर)

संपूर्ण लग्न बस्ता
आराधना होलसेल शॉपिंग मॉल
आराधना लाडली बहना उपहार योजना
खरीदारी करें और भाग्यशाली बनें
डेली ड्रॉ | मंथली ड्रॉ | मेगा ड्रॉ
प्रत्येक 1000/- रु की खरीदी पर पाईये एक लकी कूपन
2100/- रु. की साडी फ्री
बम्पर 10 उपहार
फॅशन | ज्वेलरी | चिल्ड्रेन्स वेअर | शूज व सँडल | होम डेकोर | मॅचिंग
जवाहर रोड, अमरावती. © 2574594
L-2, बिझीलँन्ड, नांदगावपेठ, अमरावती.

रघुवीर उपवास के समोसे
श्याम चौक, अमरावती.

Sarvottam आंबा महोत्सव
साईनंदनवनम्, ता. चाकुर, जि. लातुर येथील सुप्रसिद्ध
साई केशर आंबा
VIDARBHA AUTHORISED DISTRIBUTOR सर्वोत्तम युनिक मार्ट
राज प्लाझा मार्केट, कंवर नगर, अमरावती. M : 82088 28325

BIGGEST AIR CONDITIONER MALL
JAPAN BRAND 1.5 TON AC
₹26499/- ONWARDS
मॉडर्न इलेक्ट्रॉनिक मॉल
RUKHMINI NAGAR 86000 500 15

Amit R. Bijwe Mob.: 9422917360
FISH O FISH AQUARIUM
Up to 20% Discount
Dog Food Accessories
Birds Cages
Pedigree, Royal Canin, N&D, Whiskas, SmartHeart, Me-O
Fishes, Fancy Imported Tank, Aquarium Accessories
Ganesh colony, Shilangan Road, (Ravi Nagar Road) Amt. ☎ : 2562939

काउच पफ़ी
Sofa Set 5 Seater ₹22,500/-
Dining Set 4 seater ₹25,000/-
Premium Bedroom Set ₹78,500/-
ड्रीमलँड, नंदा साडी के पास, नागपूर रोड, अमरावती 99300-94691

पैसे आजार बरे झाल्यावर देणे
आजारापासून मुक्त व्हा
बालाजी आयुर्वेदीक 7744000224
न्यू. राजापेठ एसटी बस स्टँड व्यापार संकुल के अंदर अमरावती

■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ ई-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ■ अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम